17 TO 23 MAY 2021 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 15/05/2021 7:05 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : २१ सोमवार दि. १७ मे २०२१ ते रविवार दि. २३ मे २०२१ पाने : ४ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

# ‘लॉकडाऊन’च्या कोंडीत जर हिसकवाल रोजगार तर पत्रकारांची लेखणी बनेल सरकारसाठी तलवार



वसई/वरिष्ठ प्रतिनिधी

लॉकडाऊन सारखे उपाय करून सुद्धा कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने महाराष्ट्र सरकार आणि खास करून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे भीतीने इतके गारठले आहेत कि त्यांना आता स्वतःच्या सावलीचीही भीती वाटायला लागलीय. यामुळे कोरोनाच्या संकटाशी मुकाबला करण्यासाठी कोणाला जवळ करायचे आणि कोणाला नाही याचाही त्यांना निर्णय घेता येत नाही. कोरोनाच्या काळात लोकांना मदत करायची कोरोना योद्धे म्हणून काम करायची ज्यांची इच्छा आहे, अशा लोकांकडे सुद्धा उद्धव ठाकरे संशयाने बघत आहेत. त्यांचा फक्त टास्क फोर्सच्या डॉक्टर लोकांवर विश्वास आहे आणि ते सांगतील तसे ते वागत आहेत.

कोरोनाच्या या संकट काळात देशातील १२ राज्यांनी पत्रकारांना फ्रंट लाईन वर्कर म्हणून नियुक्त केले आहे आणि हे पत्रकार प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून कोरोना योद्धे म्हणून काम करीत आहेत. प्रसारमाध्यमे हा लोकशाहीचा चौथास्तंभ आहे. तसेच सरकार आणि जनता यातील मीडिया हा महत्वाचा दुवा आहे. असे असताना उद्धव ठाकरे यांनी लॉकडाऊनच्या काळात मीडियामधील पत्रकारांची मदत घेण्याऐवजी त्यांना लोकल ट्रेन आणि इतर सार्वजनिक परिवहन ...पान २ वर

## ‘टास्क फोर्स’च्या दबावामुळे पत्रकारांवर अन्याय...

मागील वर्षी लॉकडाऊनच्या काळात खाजगी रुग्णालयाने कोरोनाग्रस्तांची प्रचंड लूट केली होती आणि या लूटीला प्रसारमाध्यमानी वाचा फोडल्याने काही खाजगी रुग्णालयावर कारवाई झाली होती. त्यामुळे त्या रुग्णालयाचे जे संचालक डॉक्टर होते. त्यांचा पत्रकारांवर राग होता आणि म्हणूनच पत्रकारांना प्रवासाची सवलत देऊ नये असा आग्रह डॉक्टरांनी सरकारकडे धरला होता असे समजते. त्यामुळेच सरकार लॉकडाऊनच्या काळात पत्रकारांना फ्रंट लाईन वर्कर म्हणून संधी द्यायला. तसेच प्रवासाची सवलत द्यायला तयार नाही. त्यामुळे पत्रकारांमध्ये प्रचंड असंतोष आहे. विरोधी पक्ष नेते फडणवीस यांनी सुद्धा मुख्यमंत्र्यांना पात्र पाठवून पत्रकारांना फ्रंट लाईन वर्कर म्हणून काम करण्याची संधी द्या अशी विनंती केली होती. पण त्यांच्या विनंतीही केराची टोपली दाखवण्यात आली.

## संपादकीय

## डरपोकांच्या राज्यात...

मुठभर मावळ्यांचा मदतीने आदिलशाह आणि मोगल बादशहाला धूळ चारून ज्या छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे तोरण बांधले तो पराक्रमी महाराष्ट्र आज डरपोक राज्यकर्त्यांच्या हाती आहे. महाराष्ट्राची दशा आणि दिशा काय असावी हे आता राज्यकर्ते नाही, तर टास्क फोर्स मधले चार वैदू ठरवत आहेत. यावरून महाराष्ट्र किती कमजोर झालाय याचा अंदाज येवू शकतो आणि अशा लोकांच्या हाती महाराष्ट्राची सूत्रे असताना पत्रकारांना फ्रंट लाईन वर्कर म्हणून जाहीर करा ही मागणी कितपत योग्य आहे. मुळात लॉकडाऊनच्या काळात पत्रकारांना ज्या सवलती मिळायला हवी होत्या त्या तर मिळाल्याचं नाहीत, उलट त्यांच्या बाहेर हिंडण्या फिरण्यावर, लोकल प्रवासावर बंदी घालण्यात आली आणि ही बंदी अर्थातच त्या चार वैदुंच्या सांगण्यावरूनच घालण्यात आलीय. कारण आजकाल उद्धव ठाकरे स्वतःच्या डोक्याने कुठलेच काम करीत नाही. सगळा कारभार वैदूंच्या सल्ल्यावरून चालतो. पण त्यापेक्षा मंत्री मंडळ बरखास्त करून महाराष्ट्राचा सगळा कारभारच या वैदूंनच्या हाती द्यावा आणि सरकारचे काम मंत्रालयातून चलवण्या ऐवजी जे.जे.हॉस्पिटल मधून चालवावे म्हणजे कोरोना पासून ही मुक्ती मिळेल आणि विरोधी पक्षांची कटकटही राहणार नाही. खरंच कुठे नेवून ठेवलात रे बाबांनो माझा महाराष्ट्र? आज संकटाच्या काळात कोरोना बाबतची इत्यंभूत माहिती लोकांना मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे कोरोना विरुद्धच्या लढ्यात पत्रकारांना फ्रंट लाईन वर्कर म्हणून सामावून घेणे गरजेचे होते. पण कोरोनाच्या काळात खाजगी हॉस्पिटलकडून कोरोनाग्रस्त आणि त्यांच्या नातेवाईकांची कशी लूट करण्यात येत होती याचा पत्रकारांनी समाजासमोर पंचनामा केला. खाजगी हॉस्पिटलच्या काही भानगडी बाहेर काढल्या. त्यामुळे डॉक्टरांचा पत्रकारांवर राग आहे आणि या रागमुळेच ते सतत पत्रकारांच्या विरुद्ध सरकारला सल्ले देत असतात आणि सरकार त्यांचे सल्ले ऐकूनच पत्रकारांवर अन्याय करीत आहे. खरे तर या अन्यायाच्या विरुद्ध सर्व पत्रकारांनी एकजूट होऊन आवाज उठवायला हवा. कारण मीडिया हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. याच स्तंभाच्या जागरुकतेमुळे समाजातील बऱ्या वाईट घटना लोकांसमोर येतात. सरकार आणि जनता यातील मीडिया हा प्रमुख दुवा आहे. त्यामुळे कुणाच्या तरी सांगण्यावरून सरकारने लोकशाहीचा हा चौथा स्तंभ जबरदस्तीने झाकून ठेवू नये. सध्या लॉकडाऊनमुळे काही ठिकाणी वर्क फ्रॉर्म होमचा काम चलाऊ पर्याय सुरू आहे. पण पत्रकारांसाठी हा पर्याय त्यांच्या कामाच्या दृष्टीने तितकासा उपयुक्त नाही. कारण पत्रकारांना एखाद्या घटनेची माहिती घेवून त्याच वृत्तांकन करण्यासाठी घटनास्थळी जावे लागते. तिथली परिस्थिती पहावी लागते. ती घटना नेमकी कशामुळे घडली याची आजूबाजूच्या लोकांकडून माहिती घ्यावी लागते. त्या घटनास्थळाचे फोटो घ्यावे लागतात. वर्क फ्रॉम होममध्ये ते शक्य नाही. म्हणूनच पत्रकारांना सार्वजनिक परिवहन सेवांमधली वाहनातून प्रवासाची सवलत मिळायला हवी. मुंबई सारख्या शहरात तरी काही पत्रकरांकडे स्वतःची वाहने आहेत. पण ग्रामीण भागातील पत्रकारांकडे तीही नाहीत. काही ठराविक पत्रकारांकडे स्वतःची वाहने आहेत. पण बहुसंख्य पत्रकार हे एसटी बसेस किंवा रिक्षाचा वापर करतात आणि सध्या तर जय जिल्ह्यात कडक लॉकडाऊन आहे. तिथली एसटी सेवाही बंद आहेत. अशा स्थिती जर जिल्हाअंतर्गत एखादी मोठी घटना घडली तर त्या घटनेचे वृत्तांकन करण्यासाठी तिथे पत्रकारांनी पोहचायचे कसे? याचे उत्तर राज्याचे नेतृत्व करणाऱ्या मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी द्यावे. महाराष्ट्राने अनेक संकटे झेलून त्यातून मार्ग काढला आहे. कारण शिवप्रभूच्या या महाराष्ट्रात गवतलाही भाले फुटतात, असा या मातीचा इतिहास आहे आणि त्याची अनेक उदाहरणे देता येतील. शिवाजी महाराजांनी भर पावसाळ्यात आणि रात्रीच्या अंधारात पन्हाळ्याचा सिद्धी जोहरचा वेढा फोडून विशालगड गाठला होता. त्यासाठी बाजी प्रभू देशपांडेंनी छातीची ढाल करून पावन खिंडीत शत्रूला रोखले होते. हा आहे लढवय्या महाराष्ट्राचा इतिहास. शिवाजी महाराजांच्या नावावर पैसे कमावणारे आणि सत्ता मिळवणाऱ्या लोकांना या इतिहासाची तरी आठवण असायला हवी होती. अफजल खान, सिद्धी जोहर, मिर्झा राजा यांच्या सारखे बलाढ्य शत्रू महाराष्ट्रावर चाल करून आले. त्यांनी जनतेचा छळ केला. पण शिवाजी महाराज या संकटाला घाबरून स्वतःही लपून बसले नाहीत आणि जनतेलाही दाराला कड्या लावून घरात लपून बसा असा सल्ला दिला नाही. काहीही झालं तरी संकटाचा मुकाबला करून लढून मरायचे, ही शिवाजी महाराजांची शिकवण होती. ज्यांना महाराजांच्या याच शिकवणीचा विसर पडला असेल आणि जे कोरोनाच्या भीतीने थरथरत असतील आणि जनतेलाही घाबरवत असतील त्यांना सत्तेत राहण्याचा आणि कोरोनाशी लढण्याची जिद्द बाळगणाऱ्यांचा मार्ग रोखण्याचा जराही अधिकार नाही. अशा लोकांनी सत्तेतून पायउतार होऊन कोरोना पासून स्वतःचा जीव वाचवण्यासाठी सुरक्षित स्थळी जावे हवे, तर स्वतःबरोबर त्यांच्या सल्लागार वैदूंनही सोबत न्यावे. मात्र महाराष्ट्र कोरोनाला घाबरणार नाही आणि कोरोनाच्या भीतीने घरात सुद्धा बसून राहणार नाही.

## प्रतिस्पर्ध्यांनी त्याच्यावर अचूक साधला नेम तडीपार गुंडाचा दिवसा ढवळ्या केला गेम



मयत शहानवाज

नागपूर/क्राईम रिपोर्टर

महाराष्ट्राची उप राजधानी असलेल्या नागपूर शहराची खरी ओळख हि क्राईम कॅपिटल अशीच आहे. कारण या शहरात अनेक वेळा दिवसाढवळ्या खून, दरोडे, बलात्कार, खंडणीसाठी अपहरण यासारख्या गंभीर घटना घडल्या आहेत. येथे अनेक गुन्हेगारी टोळ्या सक्रिय आहेत आणि त्यांच्यात टोळीयुद्ध सुद्धा भडकत असते. नुकतीच नागपुरात एका कुख्यात गुंडाची निर्घृण हत्या करण्यात आली हि हत्या अर्थातच पूर्ववैमन्यस्यातून करण्यात आली असावी असा पोलिसांना संशय असून मृत गुंड हा दाखलेबाज आणि तडीपार होता. तसेच त्याच्यावर गंभीर गुन्ह्यांची नोंदही असून पोलीस या प्रकरणी आरोपींचा शोध घेत आहेत.



नागपूरच्या कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीत कुख्यात गुंड शहानवाजची हत्या करण्यात आली. आरोपीने चाकूने वार करत हत्या केली. मृतक हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून तडीपार आरोपी होता. जुन्या वादातून ही हत्या झाली असल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासातून पुढे आलं आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतसं असून तपास सुरू केला आहे. मृतक आणि आरोपी महाल परिसरातील शिवाजी पुतळ्या जवळील रोडवर सकाळी १०.३० च्या सुमारास ...पान २ वर

## दुसऱ्या ऐरियातील मुलीशी प्रेमविवाह केला निरपराध रिक्षा चालक जीवानिशी गेला



मयत विजय



अंबरनाथ/राजेंद्र वेदांते

दुसऱ्याचा द्वेष करणे आणि त्याला सतत एखाद्या गोष्टीवरून त्रास देणे हे काही लोकांच्या रक्तातच असते आणि खास करून जे टवाळखोर असतात. स्वतःला त्या भागातले भाई समजत असतात. अशा लोकांचा जर वेळीच बंदोबस्त केला नाही, तर असे लोक एखाद्या निरपराध माणसाचा जीव घ्यायलाही मागेपुढे पाहत नाहीत. अंबरनाथमध्ये अशीच एक घटना घडली. एका रिक्षा चालकाचे दुसऱ्या ऐरियातील मुलीबरोबर प्रेमसंबंध होते. त्यांनी तिच्याबरोबर प्रेम विवाह केला. त्यामुळे ती मुलगी ज्या भागातली होती त्या भागातील टवाळखोर चिडले आणि या शुल्लक कारणावरूनच त्यांनी त्या रिक्षा चालकाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीना अटक केली आहे.

अंबरनाथमध्ये विजय नवलगीरे हा रिक्षाचालक राहत होता. याच भागात राहणाऱ्या दर्शना या तरूणी बरोबर विजयची ओळख झाली. दर्शनाला बाहेर काही कामानिमित्त जायचे ...पान २ वर

## शेजारणीशी बोलणे नडले राव घरच्यांनी तिच्या साधला डाव



मुंबई/राजेंद्र वेदांते

कुटुंबातील तरुण मुलीच्या हालचालीवर तिच्या घरच्यांची बारीक नजर असते. कारण तिच्या मुले कुटुंबाची बदनामी होऊ नये हाच त्यामागचा हेतू असतो. कांदिवलीच्या गणेश नगरमध्ये राहणाऱ्या विक्की गुप्ता याला शेजारच्या तरुण मुलीशी बोलणे चांगलेच भारी पडले. कारण तिच्याशी बोलताना तिच्या घरच्यांनी त्याला पाहिले होते. त्यामुळे आपली मुलगी त्याच्या प्रेमात तर पडली नाही ना? असा त्यांना संशय आला आणि त्याच संशयातून त्यानी विक्कीची हत्या केली असावी असा विकीच्या कुटुंबियांना संशय असून या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

कांदीवली (पूर्व) समता नगर पोलीस ठाण्याच्या ...पान २ वर

## ‘लॉकडाऊन’मध्ये त्याची नोकरी गेली बायको मुलाला मारून आत्महत्या केली

पुणे/क्राईम रिपोर्टर

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नेतेमंडळी लॉकडाऊन लावण्याचा आग्रह धरतात. पण या लॉकडाऊनमुळे लोकांची काय अवस्था होते याची त्यांना कल्पना आहे का? लॉकडाऊनचा आग्रह धरणाऱ्यांची आर्थिक स्थिती चांगली असल्याने त्यांना कितीही दिवस लॉकडाऊन लावला तरी फरक पडत नाही. पण या लॉकडाऊनमध्ये ज्याचा रोजगार बुडतो त्याची मात्र केविलवाणी अवस्था होते आणि अखेर त्याच्यावर आत्महत्येची वेळ येते. हवेली तालुक्यातील कदमाकवस्ती येथे लॉकडाऊनमुळे नोकरी गेल्याने उपासमारीची पाळी आलेल्या एका टेम्पो चालकाने आपली पत्नी व मुलांना ठार मारून आत्महत्या केली. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



हवेली तालुक्यातील कदमाकवस्ती येथे दऱ्याप्पा अर्जून शिंदे हे आपल्या कुंटूंबासह राहयला आहेत. त्याचे एकत्रीत कुंटूंब असून त्याचा मोठा मुलगा हनुमंत शिंदे हा पत्नी प्रज्ञा आणि मुलगा शिवतेज दुसरा मुलगा प्रथमेश आणि मुलगी ईश्वरी यांच्यासह राहत आहेत. दऱ्याप्पा हे कुंटूब प्रमुख म्हणून घरचा सगळा व्यवहार बघत होते. हनुमंत हा गेल्या काही वर्षांपासून एका सिमेटच्या टेम्पोंवर ड्रायव्हर म्हणून काम करीत आहे. तर पत्नी प्रज्ञा ही घरात शिवणकाम करून संसाराला हातभार लावीत असते. या दोघा पती पत्नीचा संसारा हा सुरूळीत आणि व्यवस्थीत सुरू होता. त्यातच गेल्या काही दिवसापासून कोरोनाची दुसरी लाट वाढल्याने पुण्यासारख्या शहरात प्रशासनाने कडक लॉकडाऊन केले. त्यामुळे कोरोनाचा ससर्ग कमी होऊ शकतो म्हणून संचारबंदी ही केली. तरीही कोरोनाची साखळी काही तुटेना उलट कोरोनाचे रुग्ण वाढू लागले. परिणामी ही कोरोनाची संसर्गाची साखळी तोडण्यासाठी प्रशासनाने ...पान २ वर

## दारूची नशा त्याच्या डोक्यात गेली मित्राने मित्राची निर्घृण हत्या केली







आरोपी शहाबाज

जळगाव/क्राईम रिपोर्टर

माणसाच्या अंगी अहंकार असला कि त्याला स्वतः शिवाय इतर सगळे तुच्छ वाटत असतात आणि त्यांच्याशी मग त्याच भावनेने तो वागत असतो. विशेष म्हणजे असे लोक आपला रॉब जमवण्यासाठी समोरच्याला स्वतःच्या पैशाने दारू आणि इतर वस्तू देत असतात. दारूच्या पार्ट्या करीत असतात आणि ज्याला दारू पाजतात त्याला दारूच्या नाशेत चार गोष्टी सुनवूनही दाखवतात. भुसावळ येथील शाहबाज शहा हा सुद्धा असाच अहंकारी होता. त्याने एकेदिवशी मित्राला दारू प्यायला नेले. त्याला भरपूर दारू पाजली आणि दारूच्या नशेत त्याची उणीधुणी काढून त्याला शिव्या घालू लागला. त्यामुळे मित्रही चिडला आणि तोही त्याला उलट बोलला, पण त्याचे उलट बोलणे शहाबाज याला सहन झाले नाही आणि त्याने रागाच्या भरात मित्राची हत्या केली. मात्र दोन दिवसांनी पोलीस ठाण्यात स्वतःहून हजर होऊन त्याने गुन्ह्याची कबुली दिली. ...पान २ वर

## मोबाईलवर बोलण्याचा नाद जीवावर बेतला संशयी पतीने पत्नीचा जीवच घेतला

शिराळा/क्राईम रिपोर्टर




मोबाईल हा सध्या माणसाच्या जीवनाचा एक घटक बनला आहे. शहर असो कि खेडेगाव प्रत्येक माणसाकडे आजकाल मोबाईल असतो आणि काही लोकांना तर खास करून महिलांना मोबाईलवर तासन्तास बोलण्याची सवय असते. पण हीच सवय एका विवाहितेच्या मृत्यूला कारणीभूत ठरली. फकीरवाडी येथे राहणारी सुवर्णा तासन्तास मोबाईलवर बोलत असल्याने तिच्या नवऱ्याच्या मनात संशय येऊ लागला आणि पती-पत्नीमध्ये भांडणे होऊ लागली. यावेळी सुवर्णाच्या दिराने आगीत तेल ओतले. त्यामुळे सुवर्णाचा पती अधिकच चिडला आणि एकेदिवशी त्याने कोयत्याने गला चिरून सुवर्णाची हत्या केली आणि स्वतःही विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पोलिसांनी तिच्या पतीसह सासरच्या मंडळींवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. ...पान २ वर

## दारूच्या नशेत हाणामारी झाली एकाने दुसऱ्याची हत्या केली



मयत राजू





आरोपी दीपक

हातकणंगले/क्राईम रिपोर्टर

दारूची नशा एकदा का माणसाच्या डोक्यात गेली कि त्याचा स्वतःवरचा ताबा सुटतो आणि मग समोर दिसेल त्याच्याशी तो भांडण करू लागतो. अशावेळी समोरचा माणूसही जर नशेत असला तर तोही गप्प राहत नाही आणि शुल्लक कारणावरून झालेले दोन दारूड्यांमधील भांडण एकाच्या कोणाच्या तरी प्राणावर बेतते आणि त्यात त्याचा जीव जातो. माजले गावाच्या हद्दीत असलेल्या दारूच्या अड्ड्यावर असेच दोन दारूड्यांमध्ये भांडण झाले आणि एकाने दुसऱ्याला अगोदर लाकडी दांड्याने मारहाण केली आणि नंतर त्याच्या डोक्यात दगड घालून त्याचा खून केला.

हातकणंगले तालुक्यातील कुंभोज जवळील नेज शिवपुरी येथे राजू जाधव आणि दिपक कांबळे हे राहयला आहेत. दोघे ही गावात अट्टल पिंडके म्हणूनच ओळखले जातात. त्यातच दिपक कांबळे हा सराईत गुन्हेगार असल्याने त्याचेवर हातकणंगले पोलीसात वेगवेगळे गुन्हे दाखल ...पान २ वर

# कोरोना काळात मदतीचा हात देणाऱ्यावरच प्राणघातक हल्ला



**ठाणे/राजेंद्र वेदांते**

कोरोनाने सर्वत्र प्रचंड दहशत निर्माण केली आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव इतका भयंकर आहे की कोण, कधी या जगाचा निरोप घेईल हे सांगता येत नाही. प्रत्येक जण आपला आणि आपल्या परिवाराचा जीव वाचवण्यासाठी धडपडत आहे. अशा कठीण परिस्थितीत कोण कुणाची मदत करण्यास पुढे येताना दिसत आहे. पॉजिटिव्ह रूग्णाच्या संपर्कात जाऊन आपला जीव धोक्यात घालायला कुणी तयार नाही. कारण हि वेळच तशी आहे. अशा वेळी कुणी कुणाचे नसते. सर्व जवळपासची नाती सुद्धा त्या रूग्णाच्या जवळ फिरकत नाहीत. अशाच कठीण काळात प्रत्येक नागरीकाला मदतीचा हात देणाऱ्या एका समाजसेवकावर दिव्यात प्राणघातक हल्ला झाला.

विरेंद्र गुप्ता (वय ३०) हा तरुण ठाणे येथील दिवा भागात समाजसेवक म्हणून काम करतो. निस्वार्थपणे काम करीत असताना तो आपल्या पगारातील थोडी रक्कम अडल्यानडल्या कोव्हीड रूग्णांवर खर्च करतो. कोणताही जात, धर्म किंवा पंथ न पाहता विरेंद्र गृप्ता हा प्रत्येक रूग्णासाठी मदत करीत असतो. कधी आर्थिक मदत तर कधी श्रमदानाची मदत. कोरोनाचा प्रादुर्भाव जडलेल्या पेशंटला रूग्णालयात दाखल करण्यापासून ते मृत पेशंटला मुखअग्नि देईपर्यंत हा तरूण निस्वार्थपणे झटत असतो. त्याच्या या कामामुळे दिव्यातील नागरिकांचा तो गळ्यातील ताईत बनला होता. प्रत्येक जणांच्या तोंडी विरेंद्र गुप्ता याचे नाव येत होते. यामुळे काही स्थानिक राजकीय पक्ष त्याला आपल्या पक्षात राहून काम करण्यास गळ घालत होते. परंतू विरेंद्र गुप्ता हा कुणाच्याही पक्षाची मदत घेऊन काम करण्यास तयार नव्हता. गेल्या दहा वर्षांपासून विरेंद्र गुप्ताने समाजसेवकासा वसा प्रामाणिकपणे सांभाळला आहे. मागच्या आठवड्यात कामावरून तो घरी येत होता. तेंव्हा एक पेशंट एका रूग्णाच्या मुलासाठी प्लाझमा हवा होता, त्याचे म्हातारे वडील रस्त्यावर उभाराहून रडत होते. हे विरेंद्र गुप्ताने पाहिले. त्याने आपली गाडी उभी करून विचारपूस केली. पेशंट व त्याच्या वृद्ध वडीलांना आधार देत स्वतः दोन तास थांबून स्वतः चा प्लाझमा दिला. एवढेच नाही तर लॉकडाऊनमध्ये कमीत कमी २०००च्या आसपास कुटूंबाना रेशन उपलब्ध करून दिले. मेडिकल कॅम्प असो किंवा पूरग्रस्त मदत असो किंवा धार्मिक सामाजिक कार्यक्रम असो नेहमी पुढे, असणारा हा देवमाणूस आज गंभीर जखमी आहे. गुप्ताच्या लॉकडाउन मधील कार्याची दखल प्रत्यक्ष आमदार राजू पाटील यांनी सुध्दा घेतली आणि त्याच्या ट्रस्टला मदत केली. त्याशिवाय अनेक राजकीय सामाजिक लोकांच्या मदतीने अखंडपणे समाजसेवा करणारा समाजसेवक गुप्तावर भाडोत्री गुंड बोलवून भ्याड हल्ला करण्यात आला. विरेंद्रने आमच्या पक्षातर्फे हे काम करावे अशी अट एका राजकीय पक्षाने घातली होती. परंतू त्याने त्यांची अट मान्य न केल्यामुळे त्याच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. काही भाडोत्री गुंडानी विरेंद्र याला जीव जाईपर्यंत माराहाण केली. यात तो गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणात पोलिसांची भूमिका हि संशयास्पद असल्याचे स्थानिक नागरीकांचे म्हणणे आहे. पोलिसांनी याप्रकरणात गुन्हा दाखल करून संबंधित आरोपींवर कठोर कारवाई केली पाहिजे होती. मात्र तसं काही या प्रकरणात दिसत नाही. उलट पोलीसच हे प्रकरण तडजोड करून बाहेरच्या बाहेर मिटवून घ्या असा सल्ला पिडीत विरेंद्र गुप्ता याला देत असल्याचे समजते.

# मुंबई–नाशिक महामार्गावर टेम्पो चालकासह दोघांना लुटणाऱ्या तिघा चोरट्यांना अटक



**भिवंडी/अभिजित हिरे**

नाशिक येथून बटाटा टेम्पोत भरून कल्याण येथे जात असताना भिवंडी तालुक्यातील मुंबई–नाशिक रोडवरील सरवली पाडा इथं टेम्पोच्या मागून दुचाकीवरून येणाऱ्या तिघा चोरट्यांनी टेम्पो चालकाला थांबवून चालक जावेद शाह सह त्यांच्या सहकाऱ्याला धमकी देत ब्लेडचा धाक दाखवून हाताला चावा घेऊन दोघांना मारहाण करीत टेम्पोच्या काचा फोडून मोबाईल आणि रोख रक्कम लुटून नेल्याची घटना शनिवारी घडली असताना टेम्पो चालक जावेद शाह यांनी कोनगाव पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखलं केला असता या गुन्ह्यांची दखल वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणपतराव पिंगळे यांनी घेऊन पोलीस पथक तयार करून काही तासात आरोपी सुरज पटेल, संतोष पालकवाला, अभिषेक देशमुख तिघे राहणार कामतघर यांना अटक करून त्यांनी गुन्ह्यात वापरलेली दुचाकी, तर लुटलेला मोबाईल, रोख रक्कम असा ३४ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# भिवंडीत लसीकरणात स्थानिक नागरिकांना प्राधान्य देण्याची मागणी

**भिवंडी/आकाश गायकवाड**



भिवंडीतील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी करण्यात येणारे लसीकरण सध्या लसींच्या अभावामुळे बंद करण्यात आले असल्याने भिवंडी ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्येत वाढ झाली आहे. मात्र लसीकरण सुरु असतांना ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांवर ठाणे मुंबई व आजूबाजूच्या शहरातील नागरिक येऊन लसीकरण करत असल्याची बाब अनेक वेळा समोर आली असून स्थानिक ग्रामीण भागातील नागरिकांना प्राधान्याने लस देण्यात यावी व ग्रामीण भागातील नागरिकांचे लसीकरण पूर्ण झाल्यानंतरच इतर शहरातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य केंद्रांवर लस द्यावी अशी मागणी ठाणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य ब बांधकाम समितीचे माजी सभापती सुरेश म्हात्रे बाळ्या मामा यांनी ठाणे जिल्हा परिषदेचे जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. राज्य शासनामार्फत लसीकरणासाठी ऑनलाईन प्रक्रिया राज्यात राबवली जात आहे. ग्रामीण भागातील लोकांना स्मार्ट फोन, इंटरनेट, मोबाईल नेटवर्क याच्या अभावी प्रत्येकाला नोंद करता येत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना कोरोनाच्या लसीकरणापासून वंचित रहावे लागत आहे. ठाणे जिल्हा परिषदेच्या ३३ प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये शहरी भागातील लोक लसिचे ऑनलाईन रजिस्टर करून मोठ्या प्रमाणात गर्दी करत आहेत. त्यामुके ग्रामीण भागातील नागरिकांना लासीकरणासाठी मोठी अडचण निर्माण झाली असून सध्या ग्रामीण भागातील लससाठा देखील संपुष्टात आला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक लासीकरणापासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे ग्रामिण भागातील स्थानिक नागरिकांना प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रावरती त्यांच्या आधारकार्डच्यामार्फत ऑफलाईन प्रक्रिया राबवून प्रथम प्राधान्य देऊन, ग्रामीण भागातील लोकांना जास्तीत जास्त लसीकरणाची संधी निर्माण करून लाभ मिळवून द्यावा अशी मागणी माजी सभापती सुरेश म्हात्रे यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

# मंगळवेढा येथे देशी-विदेशी दारूच्या अवैध विक्रीवर पोलिसांचा छापा

**सोलापूर /इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथे देशीविदेशी दारूची अवैध विक्री करणाऱ्या ठिकाणी छापा मारून एकूण ४४ हजार ३७ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखेने केली आहे. सोलापूर पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, सोलापूर ग्रामीण यांनी कोराना काळात चोरून चालणाऱ्या जिल्हयातील अवैध धंदयाचा आढावा घेवून वाळू व इतर अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करणेबाबत संपूर्ण जिल्हा व एलसीबीचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुसार जिल्हयात चोरून चालणारे अवैध दारू, वाळू उपसा व वाळू वाहतुकीवर कडक कारवाई करणेकरीता पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांनी गुन्हे शाखेकडील विशेष पथकाची नेमणूक केली आहे.



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील त्यांचे आदेशान्वये जिल्हयातील अवैध धंद्यावर कारवाई करीत असताना सपोनि रवींद्र मांजरे व त्यांच्या टिमला बातमीदाराकडून बातमी मिळाली की, मंगळवेढा येथील सुर्यवंशी वस्ती, पंढरपूर रोड मंगळवेढा जि. सोलापूर येथील एक इसम हा आपल्या राहत्या घरी देशी विदेशी दारूची मोठया प्रमाणात विक्री करीत असल्याची बातमी मिळाली होती. त्यानंतर पथकासह पंढरपूर रोड मंगळवेढा येथील सुर्यवंशी वस्ती जि. सोलापूर येथे जावून बातमीप्रमाणे खात्री केली असता सदर ठिकाणी मध्यम वयस्कर इसम हा घरासमोर खूर्चीवर बसून देशी विदेशी दारूची अवैधरित्या विक्री करीत असल्याची खात्री झाल्यानंतर सदर ठिकाणापासून काही अंतरावर वाहन थांबवून पायी चालत सदर ठिकाणी गेलो असता त्या ठिकाणी मोठया प्रमाणात अवैधरित्या देशी–विदेशी दारूचा साठा घरातील लाकडी दिवाणमध्ये ठेवलेला मिळून आला.

सदर ठिकाणी २९,५९७ रुपये किंमतीच्या मॅकडॉल नंबर १ विस्की व रम, इम्पिरिअल ब्लू विस्की, रॉयल स्टॅग विस्की, डीएसपी ब्लॅक विस्की, ब्लेन्डर प्राईड विस्की, बॅग पाईपर व्हिस्की, देशी संत्रा, सिग्नेचर विस्की, ॲन्टीक्युटी ब्लू विस्की, ब्लेन्डर प्राईडच्या एकूण १८८ बाटल्या व १४,४४० रुपये कंमतीच्या देशी विदेशी बाटल्या विकून आलेली रोख रक्कम असे एकूण ४४,०३७ रुपयांचा मुद्देमाल सदर ठिकाणी मिळून आल्याने तो गुन्हयाचेकामी जप्त केला असून सदर इसमा विरूध्द मंगळवेढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगिरी ही सोलापूर पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांचे नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे, सफौ ख्वाजा मुजावर, पोलीस अंमलदार नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, चालक समीर शेख यांनी बजावली आहे.

# आंबेडकरी चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ते अशोक गायकवाड यांचे निधन

**भिवंडी/रवि शिंदे**



तालुक्यातील शेलार गावात राहून ठाणे जिल्ह्यातील महापालिका कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी अहोरात्र लढा देऊन न्याय देणारे कामगार नेते त्याच प्रमाणे वयाच्या १५व्या वर्षापासून आंबेडकरी चळवळीत झोकून देऊन नेहमीच पुढाकार घेणारे निष्ठावंत कार्यकर्ते अशोकदादा गायकवाड यांचे अल्पशा आजाराने निधन झाल्याने कामगारांचे नेते तसेच आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ता गमावल्याची खंत ठाणे जिल्ह्यातील त्यांचे कार्यकर्ते व्यक्त करीत आहे. ते काँग्रेस ठाणे जिल्हा सचिव पंकज गायकवाड यांचे वडील असून ठाणे जिल्हा परिषद माजी सदस्या विजयाताई यांचे पती होते. तर वसई तालुक्यातील धुकटान गावातील आदिवासी दलित सेनेचे संस्थापक अध्यक्ष दिलीप गायकवाड यांचे जेष्ठ बंधू होते.

अशोकदादा गायकवाड यांचे मूळ गाव वसई तालुक्यातील धुकटान असून ते कामानिमित्त भिवंडी तालुक्यातील शेलार गावात अनेक वर्षापासून राहत होते गायकवाड यांनी ठाणे, पालघर जिल्ह्यातील महानगरपालिका कामगारांसाठी अनेक आंदोलने केली असून ते चांगले मार्गदर्शक सुद्धा होते. ते वेळे प्रसंगी कामगार युनियनसाठी अहोरात्र मेहनत करीत होते. समाजामध्ये त्यांनी आपली चांगली प्रतिमा निर्माण केली होती. त्यामुळे सामाजिक हानी झाली आहे. तर सामाजिक, राजकीय, आंबेडकरी चळवळीतील एक निष्ठावान कार्यकर्ता काळाने हिरावून नेला आहे. त्यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीत निर्माण झालेली पोकळी कधीही भरून येणार नाही. अशा या निष्ठावान कार्यकर्त्याला आणि कामगार नेत्याला भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली असून सामाजिक, राजकीय, आंबेडकरी चळवळ तसेच कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी आपल्या कुटुंबाला सुद्धा तयार केले असून त्यांच्या पत्नी विजयाताई गायकवाड यांना ठाणे जिल्हा परिषदेच्या सदस्या बनवले होते. तर मुलांना चांगल्या प्रकारे शिक्षण देऊन मोठा मुलगा पंकज गायकवाड यांना राजकीय क्षेत्रात उतरून ते आता काँग्रेस ठाणे जिल्हा सचिव पदावर असून त्यांनी संविधान बचाव महापरिषद भरवली होती. ते सुद्धा, कामगार नागरिकांच्या समस्या सोडवत आहे. तर त्यांचा लहान मुलगा आकाश गायकवाड यांना केमिकल इंजिनियर बनवले असून ते पत्रकारीतेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत आहे. तर त्यांचे लहान भाऊ दिलीप गायकवाड हे सुद्धा आदिवासी दलित सेनेचे अध्यक्ष असून आदिवासी, दलितांसाठी कामे करीत आहेत. अशाच पद्धतीने अशोकदादा गायकवाड यांनी आशा पद्धतीने कामगार नेते आणि आंबेडकरी चळवळी साठी अनेक कार्यकर्ते सुद्धा निर्माण केले आहे.

## कामगारांच्या प्रश्नावर मनसे झाली आक्रमक

# एअरप्रो कंपनी व्यवस्थापनाला दिला इशारा

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा तालुक्यातील कंपनीमध्ये काम करणाऱ्या कामगार वर्गावर भांडवलदार (मालक) आणि व्यवस्थापन मोठ्या प्रमाणात अन्याय करत असल्याने तालुक्यातील महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाली आहे. जिल्हा अध्यक्ष अविनाश जाधव व कामगार सेना उपाध्यक्ष संदीप राणे यांच्या मार्गदर्शनाने काही दिवसांपूर्वी वसुरी येथील एअरप्रो इंजिनिअरिंग प्रा.ली. या कंपनीतील बहुतांश भूमिपुत्र कामगारांनी मनसेत प्रवेश केला आहे. या कंपनीत कामगारांना बेसिक सुविधा मिळणे तर लांबच पण कोविड काळात सरकारने दिलेली सूचनांचे सुद्धा पालन केलं जात नाही. येथील काही कामगार हे कोवीड पॉझिटिव्ह असून देखील त्यावर तात्काळ उपचार न करता कंपनी व्यवस्थपनाने जाचक अटी व शर्ती ची यादी तयार करून त्यावर सही करणेसाठी कामगारांवर जबरदस्ती केली. कामगारांनी नकार दिल्याने बेजबाबदार व्यवस्थापनाने सदर कामगारांना काम करणेस मज्जाव केला. यासाठी आज महापालिका कार्यकारणी उपाध्यक्ष ज्ञानेश्वर शिर्के व तालुका अध्यक्ष कांतीकुमार ठाकरे यांच्या नेतृत्वाने कंपनी व्यवस्थापनाची भेट घेऊन येत्या दोन दिवस कोरोना टेस्ट करून कामगारांना कामावर न घेतल्यास मनसेचा दणका दाखवू असा इशारा दिला. यावेळी रोजगार व स्वयंरोजगार अध्यक्ष सुरेशइ भोईर, विध्यार्थी सेना अध्यक्ष निखिल बागुल, विभागीय अध्यक्ष सावंत, मोहन शिर्के तसेच इतर पदाधिकारी आणि कामगार प्रतिनिधी सागर पाटील, सचिन गंमढेरा सुद्धा उपस्थित होते.

# राज्य ऊसनियंत्रण मंडळ समितीच्या सदस्यपदी अविनाश जाधवांची नियुक्ती



**अहमदपूर/फिरोज शेख**

राज्यातील सर्व साखर कारखानेनिहाय अंतिम ऊसदर ठरविण्यासाठी राज्य शासनाचे मुख्य सचीव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य ऊसनियंत्रण मंडळ समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यात सिद्धी शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रिजचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश बाळासाहेब जाधव यांची अशासकीय सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली. डॉ.सी.सी.रंगराजन समितीच्या शिफारशीनुसार उसापासून तयार होणाऱ्या कारखान्यातील साखर व उपपदार्थ यापासून मिळणाऱ्या महसुली उत्पन्नाच्या ७०:३० सूत्रावर आधारित राज्यातील सर्व साखर कारखानेनिहाय अंतिम ऊस दर ठरविण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा २०१३ ला कायदा अस्तित्वात आलेला आहे. त्यानुसार राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. समितीमधील साखर कारखान्याचे पाच व शेतकरी प्रतिनिधी पाच अशा दहा अशासकीय सदस्यांसह अन्य सरकारी प्रतिनिधी असतील. या निवडीबद्दल सिध्दी शुगरचे आधारस्तंभ माजीमंत्री बाळासाहेब जाधव, अहमदपूर मतदार संघाचे आमदार व सिद्धी शुगरचे चेअरमन बाबासाहेब पाटील , सिध्दी शुगरचे संचालक सुरजभैय्या पाटील, संचालिका दिपाली जाधव, सिद्धी शुगरचे व्हाईस प्रिसीडेंट पी.जी. होनराव, टेक्नीकल जनरल मॅनेजर बी.के. कावलगुडेकर, जनरल मॅनेजर (केन) पी.एल. मीटकर, प्रोसेस जनरल मॅनेजर सी.व्ही. कुलकर्णी, चीफ फायनान्स ऑफिसर राजपाल शिंदे, डिस्टलरी जनरल मॅनेजर शिंदे एस.बी., चीफ अकौंटंट एल.आर. पाटील,परचेस ऑफीसर धनराज चव्हाण आदींनी अभिनंदन केले आहे.

# सोलापूर पोलीस आयुक्तालयाच्या ताफ्यात ४८ वाहने दाखल



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या ताफ्यात नवीन दिमाखदार ४८ वाहने दाखल झाली आहेत. सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयासाठी डीपीसी मधून अडीच कोटी रुपये नवीन वाहन खरेदीसाठी मंजूर करण्यात आले होते. त्यानुसार सोलापूर पोलीस आयुक्तालयासाठी १५ नवीन स्कॉर्पिओ, २ क्रेन, ४ टोयोटा कार, २७ टीव्हीएस रेडिओन दुचाकी वाहनांची खरेदी करण्यात आली आहे. ही वाहने शनिवारी शहर आयुक्तालयाच्या ताफ्यात दाखल झाली आहेत. शनिवारी पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, पोलीस उपायुक्त डॉ.दीपाली धाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत या वाहनांची पूजा करून ही वाहने पोलीस मुख्यालयात जमा करण्यात आली. सोलापूर पोलीस आयुक्तालयासाठी पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणात दिमाखात नवीन वाहने दाखल झाली आहेत. या वाहनांमुळे सोलापूर शहरातील पोलिसांना रात्र गस्तीसाठी अत्यंत उपयोग होणार असून या वाहनांचा काळजीपूर्वक अतिशय योग्य पध्दतीने वापर करण्यात येणार असल्याची माहिती सोलापूर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी दिली आहे.

# केशवसृष्टीच्या वतीने ग्रामीण भागात ऑक्सिमिटर व थर्मामिटरचे वाटप!

**वाडा/प्रतिनिधी**



मागील वर्षभरापासून देशामध्ये कोरोना महामारीने अक्षरशः थैमान घातले आहे. कोरोना आजाराचे सर्वात महत्त्वाचे लक्षण म्हणजे शरीरातील ऑक्सिजनची पातळी कमी होणे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक भयभीत झाले आहेत. कोरोनाची बाधा झालेल्यांचे ऑक्सिजन पातळी खालावते ती तपासण्यासाठी स्थानिक डॉक्टरकडे धाव घ्यावी लागते अशा वेळी वेळ व पैसा दोन्ही खर्च होतात, ही बाब केशवसृष्टी ग्रामविकास योजनेच्या निदर्शनास आल्याने त्यांनी वाडा, विक्रमगड व जव्हार या तालुक्यातील काही गावात जाऊन येथील नागरिकांना मोफत ऑक्सिमिटर व थर्मामिटरचे वाटप केले. सध्याच्या लॉकडाउन परिस्थितीत ग्रामीण भागातील नागरिकांची आर्थिक परिस्थिती बिकट झालेली आहे. अशा परिस्थितीत ग्रामस्थ आपापले ऑक्सिजन पातळी व शरिराचे तापमान मोजणी वेळोवेळी करु शकतील हेच प्रमुख उद्दिष्ट समोर ठेवून केशवश्रृष्टी संस्थेने अतिशय गरजेचं असं ४७ ऑक्सिमिटर व ९४ थर्मामिटरचे, अत्यावश्यक औषधांच्या किटचे प्यारेसीटम गोळ्या तसेच केशवसृष्टी आयुष काढ्याचेही वाटप करण्यात आले. केशवश्रृष्टी ग्रामविकास योजनेच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

17 TO 23 MAY 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 15/05/2021 7:08 PM Page 1



### नव्या घंटा गाडी दुरुस्तीसाठी भिवंडी महापालिकेची एक कोटी सहा लाखांची निविदा

# एकही किलोमीटर न चाललेल्या गाड्यांच्या दुरुस्तीसाठी कोटींची उधळण कशाला, कॉंग्रेस नगरसेवकांचा सवाल!

**भिवंडी/अभिजित हिरे**

भ्रष्टाचार व स्वच्छतेच्या अभावासह शहरात मूलभूत समस्या पुरविण्यास अपयश येत असल्याने सतत चर्चेत असलेली भिवंडी महापालिका नव्या घंटा गाड्या खरेदीच्या मुद्यावर पुन्हा एकदा चर्चेत आली असतांनाच आता याच नव्या घंटा गाड्या रस्त्यावर एकही किलोमीटर न चालता या नव्या घंटा गाड्यांच्या निगा व दुरुस्तीसाठी मनपा प्रशासनाने तब्बल एक कोटी सहा लाख वीस हजार रुपये किंमतीची निविदा काढली आहे. विशेष म्हणजे नव्या घंटा गाड्या खरेदी करून त्या एकही किलोमीटर शहरात धावल्या नसतांनाही या घंटा गाड्यांच्या निगा व दुरुस्तीसाठी कोटींची निविदा काढल्याने कॉंग्रेस नगरसेवक अरुण राऊत यांनी आक्रमक भूमिका घेत या निविदेसह मनपा प्रशासनाच्या बेजबाबदार कारभारावर जोरदार ताशेरे ओढले आहे. तर दुसरीकडे नव्या गाड्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी कोटींची निविदा काढल्याची बाब चव्हाट्यावर आल्याने भिवंडी मनपा प्रशासन पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

शहरातील ओला आणि सुका कचरा उचलण्यासाठी पालिकेने तब्बल ५० घंटागाड्या मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यात खरेदी केल्या आहेत . सुमारे ३ कोटी २५ लाख रुपये खर्च करून या नव्या कोऱ्या घंटा गाड्या मनपा प्रशासनाने खरेदी केले आहेत. या गाड्यांना खरेदी करून आज वर्ष उलटूनही या घंटागाड्या वापरात न आल्याने



कोंबडपाडा येथील भांडारगृहात धूळ खात पडल्या आहेत. विशेष म्हणजे महापालिकेच्या मालकीच्या कोट्यवधी रुपये खर्च करून ५० घंटा गाड्या खरेदी केल्या असतांनाही मागील वर्षभरापासून नव्या घंटा गाड्या धूळखात ठेऊन घंटा गाडीच्या खासगी ठेकेदारांवर मनपा प्रशासन कोटींची उधळण होत आहे. तर या घंटागाड्यांवर चालक व इतर मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने या घंटागाड्या जागीच उभ्या असल्याचा निर्वाळा भिवंडी मनपा आयुक्त डॉ.पंकज आशिया यांनी दोन महिन्यांपूर्वी दिला होता. मात्र आता एकही किलोमीटर न धावलेल्या या नव्या घंटा गाड्यांच्या निगा व दुरुस्थीसाठी मनपा प्रशासनाने तब्बल एक कोटी सहा लाख वीस हजार रुपयांची निविदा काढली आहे. या निविदेला कॉंग्रेस नगरसेवक अरुण राऊत यांनी आक्षेप घेतला असून ज्या नव्या गाड्या रस्त्यावर धावल्याच नाहीत त्यांच्यावर दुरुस्थीसाठी कोटींची उधळण कशाला असा सवाल देखील नगरसेवक राऊत यांनी उपस्थित केला आहे. महापालिकेने ऑक्टोबर महिन्यात ५० नव्या घंटा गाड्या खरेदी केल्या असून त्यांच्या दुरुस्थीसाठीची निविदा सप्टेंबर महिन्यात काढण्यात आली आहे म्हणजे घंटा गाड्या खंगारदी करण्याच्या अगोदरच दुरुस्थीची निविदा काढण्यामागे व नव्या घंटा गाड्या इतक्या दिवस धूळ खात उभ्या ठेवण्यामागचे नेमकी गणित काय असा सवाल देखील कॉंग्रेस नगरसेवक अरुण राऊत यांनी मनपा आयुक्तांनाकडे लेखी निवेदनाद्वारे विचारला आहे. कॉंग्रेस नगरसेवकांच्या या आक्षेपामुळे भिवंडी महापालिकेचा मनमानी कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. ५० घंटा गाड्यांसाठी एकूण तीन निविदा मनपाने काढल्या असून एक निविदा वाहन चालक भर्तीसाठीची असून सदर विषय स्थायी समितीकडे प्रलंबित आहे. दुसरी निविदा या गाद्यामध्ये लावण्यात येणाऱ्या जीपीआरएस सिस्टीमसाठी आहे, तर तिसरी निविदा देखभाल दुरुस्तीसाठी असून या घंटा गाड्या जेव्हा रस्त्यावर धावणार त्यावेळी जर त्यांना काही अपघात व दुरुस्तीचे करण्याची वेळ आली तर त्यासाठी पाच वर्षासाठी हि निगा व देखभाल दुरुस्तीची निविदा काढली आहे. आता उभ्या असलेल्या घंटागाड्यांच्या दुरुस्तीसाठी हि निविदा काढली नाही अशी प्रतिक्रिया भिवंडी मनपा आयुक्त डॉय पंकज आशिया यांनी दिली आहे.

## अहमदपूरचे तरुण ठरत आहेत कोरोना रुग्णांसाठी अन्नदूत

**अहमदपूर/फिरोज शेख**



शहरातील पाच तरूणांनी एकत्र येत सामाजिक बांधीलकी जोपासण्याच्या उद्देशाने अहमदपूरातील कोवीड हॉस्पीटल व विविध इतर रूग्णालय मधील कोरोना रूग्णांना व नातेवाईकांना विनामुल्य जेवणाचे डब्बे वाटप कार्यक्रम गेल्या तीन आठवड्यापासून सुरू केलाय. हा उपक्रम रुग्णांसाठी व नातेवाईकांसाठी एक आधार बनला असून संबधीत तरूण रूग्णांसाठी साक्षात अन्नदूत बनले आहेत. सध्या देशात कोरोना संसर्गजन्य रोगाने थैमान घातले असुन त्यातच प्रशासनाने लॉक डाऊन जाहीर केल्यामुळे अहमदपूर शहरातील हॉटेल सेवा काही प्रमाणात बंद आहे. शहरात चार कोवीड हॉस्पीटल तसेच इतर हॉस्पीटल, शासकीय ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या कोरोना रूग्णांचे व नातेवाईकांचे पिण्याच्या पाण्यासाठी व जेवण्याच्या डब्यासाठी तारंबळ उडत आहे. कोरोना सारख्या महामारीच्या काळाते एकाच कुटूंबातील अनेकजण पॉझिटिव्ह असल्यामुळे रुग्णांची व नातेवाइकांची जेवणाच्या उब्यासाठी हाल होत आसल्याचे चित्र वारंवार शहरात दिसून येऊ लागले. त्यामुळे सामाजिक बांधीलकी जोपासण्याच्या उद्देशाने शहरातील विलास शेटे, शंकर मुळे, नयुम शेख, गोपीनाथ जायभाये, माधव भदाडे या पाच युवकांनी रूग्ण सेवा हिच ईश्वर सेवा हे ब्रिद वाक्य घेऊन या उपक्रमाला सुरुवात केली. पाहता पाहता त्यांनी दिवसाला ६० डब्यावरून १५० जेवणाचे डबे वाटप करणयाचे नियोजन आखले असून दररोज सकाळी १२.०० वाजता आणी संध्याकाळी ८.०० वाजता शहरातील पाटील हॉस्पीटल, बिराजदार हॉस्पीटल, कदम हॉस्पीटल, विठाई हॉस्पीटल, शासकीय ग्रामीण रूग्णालय इतर रूग्णालये व रस्त्यावर फिरणारे मनोरूग्ण तसेच ग्रह विलिगीकरणात असलेल्या रूग्णांना देखिल जेवणाचे (वरण, भात, भाजी, चपाती, खीर, सलाद, शेंगदाने) डब्बे घरपोच विनामुल्य वाटप करत आहेत. ही सेवा २६ एप्रिल पासुन चालु केली असुन लॉकडाऊन असे पर्यत हि सेवा चालु राहणार आहे.आजपर्यत जवळपास तिन ते चार हजार डब्यांचे वाटप केले आहे तसेच सायंकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत शहरात बंदोबस्तावर असलेले पोलीस, नगरपालिका कर्मचारी अधिकारी यांना चहा व बिस्किटचे वाटप देखील करण्यात येत आहे आणी प्रशासनाने जर यापुढेही लॉक डाऊन जाहीर केला तर सदरील सेवा निरंतर चालु ठेवणार आसल्याचा मनोदय या युवकांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या या उपकृमाला त्यांच्या मित्र परिवाराचे भरपूर मोलाचे सहकार्य लाभले आहे. यामध्ये काही दानशूर व्यक्तींनी सढळ हाताने मदत केली आहे.

## महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथे जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती शुक्रवार दि.१४ मे रोजी लिंगायत समाज बांधवांच्या प्रमुख उपस्थितीत साजरी करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे मराठवाडा संपर्क प्रमुख आनंद जीवने उर्फ पृथ्वीराज पाटील भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मनोहर पटणे, भाजपा शहराध्यक्ष अटल धनुरे, सामाजिक कार्यकर्ते अमोल जीवने, चेतन मिटकरी, संजय अंबुलगे, राजकुमार जीवने, बुद्धीराज डोंगरे, नागेश कुमठे, बाळू डोंगरे, संजयकुमार डोंगरे, बसवराज ईश्वरशेट, यांच्यासह आदी उपस्थित होते. यावेळी महात्मा बसवेश्वरांचना प्रार्थना करण्यात आली की लवकरात लवकर कोरोना महामारीचा काळ दूर होऊन जगामध्ये लवकरात लवकर सुख-समृद्धी यावे अशी प्रार्थना करण्यात आले.

## वाडा पोलिसांकडून गरजूंना अन्नधान्य वाटप



**वाडा/प्रतिनिधी**

मागील वर्षभरापासून कोरोना महामारीचे संकट देशावर असल्याने देशभर या संसर्गाची भीती शहरी तसेच ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये घर करून करून बसली आहे. त्यात राज्यसरकारने जमाव बंदी, संचारबंदी लॉकडाउन लागू केल्याने हातावर पोट असणाऱ्या अनेक मजुरांवर व त्यांच्या परिवारावर उपासमारीची वेळ आली आहे. ही बाब लक्षात घेऊन वाडा पोलीस दलाच्या वतीने तालुक्यातील दुर्गम भागातील पाड्यांवर अन्नधान्यचे वाटप करण्यात आले. वाडा तालुक्यातील अतीदुर्गम भागातील गाव, खेडे व पाड्यावरील बहुतेक नागरिक हे मजुरी करून आपला व आपला परिवाराचा उदरनिर्वाह भागवतात मात्र लॉकडाउन मुळे सर्व कामे बंद असल्याने त्यांच्यावर उपासमारीचा प्रसंग ओढवला आहे याची जाण ठेऊन वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधीर संखे यांनी वरसाळे, धिंडेपाडा व चारनवाडी येथील नागरिकांना अन्नधान्यचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी अप्पर पोलीस अधीक्षक प्रकाश गायकवाड, पोलीस निरीक्षक सुधीर संखे, पोलीस उपनिरीक्षक रुपाली गुंड यांच्यासह इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## बसवेश्वर जयंती निमित्त रेशन किट वाटप



**देवणी/प्रतिनिधी**

येथील संस्कृतीक सभागृहात शनिवार (दि.१५) रोजी महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती निमित्त उदगीर लिंगायत समाजाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ उद्योजक चंद्रकांतअण्णा वैजापूर यांच्या वतीने देवणी शहरातील गरीब व गरजूंना १२५ रेशन किट, मास्क, सॅनिटायझर, फळे आदी वाटप करण्यात आले. सर्वप्रथम बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पमाला अर्पण करण्यात आले. त्यानंतर प्रमुख मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. त्यानंतर बसवेश्वर जीवन चरित्रावर मनोगत व्यक्त करण्यात आले. यावेळी श्रीकांत पाटील, गुंडप्पा पटणे, शेषरावजी मानकरी, मनोहर पटणे, आनंद जीवणे, पोलीस निरीक्षक चितांबर कामठेवाड, सोमनाथ कुडते, अटलविश्वास धनुरे, राजकुमार बंडगर, बिरू कल्याणकर, शिवशंकर जीवने, चेतन मिटकरी,वाजेद येरोळे, संजय अंबुलगे, अमोल जीवने ,लखन जीवने, महेश धनुरे, पत्रकार प्रा.रेवण मळभगे, लक्ष्मण रणदिवे, कृष्णा पिंजरे आदीसह लाभार्थी व नागरिक उपस्थित होते.

## जव्हारमध्ये बँकासमोर अँटीजन तपासणी केंद्र सुरू



**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील जव्हार सारख्या दुर्गम भागात सद्यस्थितीत कोरोनाचा प्रार्दुभाव कमी होत असला तरी खावटी योजनेच्या माध्यमातून अर्थसहाय्य सुरु असल्याने बँकामध्ये मोठया प्रमाणात गर्दी होत आहे. ही ठिकाणे भविष्यात कोरोना प्रसाराची ठिकाणे होउ नयेत यासाठी जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांच्या मार्गदर्शनाखाली अपर जिल्हाधिकारी दिलीप गुट्टे यांच्या उपस्थितीत जव्हार शहरातील बँकासमोर आरोग्य विभागामार्फत अँटीजन तपासणी केंद्र सुरू करण्यात आली. जव्हार शहारातील स्टेट बँक ऑफ इंडिया, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र या बँकांच्या प्रवेशव्दारावर ही अँटीजन तपासणी केंद्र सुरु करण्यात आली असुन, तपासणी शिवाय बँक ग्राहकांना बँकेत प्रवेश देऊ नये अशा सुचना उपविभागीय अधिकारी संदीप पवार यांनी दिलेल्या आहेत. अशा स्वरुपाची कोरोंना तपासणी केंद्र उभारल्यामुळे जव्हार सारख्या ग्रामीण भाग कोरोनाचा होणारा प्रसार रोखण्यासाठी चांगली मदत होईल अशी माहिती तहसिलदार संतोष शिंदे व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे.

# पत्नीचे मसाज पार्लरमधील ग्राहकाशी विवाहबाह्य संबंध असल्याचा संशय, पतीची भलतीच करामत!

**कल्याण/प्रतिनिधी**

मसाज पार्लरमध्ये काम करणाऱ्या पत्नीचे एका ग्राहकासोबत अनैतिक संबंध असल्याचा संशय पतीला होता. याचाच गैरफायदा घेत महिलेच्या पतीने खोटा पोलिस अधिकारी बनून ग्राहकाकडून पाच लाख रुपये उकळले. आणखी पाच लाख रुपयांची रक्कम घेताना या तोतया पोलिसाला कल्याणमधील मानपाडा पोलिसांनी अटक केली आहे. तुषार शिलवंत असे आरोपी पतीचे नाव आहे. ठाण्यातील संबंधित मसाज पार्लरमध्ये जाणे डोंबिवलीतील ग्राहकाच्या चांगलेच अंगलट आले. डोंबिवलीत सागर्ली परिसरात राहणारे शंकर परब हे काही दिवसांपूर्वी मसाज पार्लरमध्ये गेले होते. मसाज पार्लरमध्ये काम करणाऱ्या महिलेशी त्यांची ओळख झाली. त्याचं



रुपांतर पुढे मैत्रीत झालं. एके दिवशी शंकर परब यांना फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने आपली ओळख वाशी येथील क्राईम ब्रांच युनिटचा पोलिस अधिकारी अशी सांगितली. मसाज पार्लरमध्ये काम करणाऱ्या महिलेसोबत तुमचे जे अनैतिक संबंध आहेत, त्यावरुन आम्ही कारवाई करणार आहोत. कारवाई टाळायची असल्यास दहा लाख रुपय द्या, असं फोनवरील व्यक्तीने सांगितलं. शंकर परब चांगलेच घाबरले. त्यांनी लगेच आरोपीला पाच लाख रुपये देण्यासाठी बोलावले. मात्र पैसे देण्याआधी त्यांना शंका आली. त्यामुळे शंकर यांनी मानपाडा पोलिसांना या प्रकरणी माहिती दिली. मानपाडा पोलिस ठाण्याचे पोलिस अधिकारी अनंत लाम आणि सिनिअर पीआय दादा हरी चौरे यांच्या मागदर्शनाखाली पोलिस तपास सुरु झाला. सापळा रचून तुषार शिलवंत याला अटक करण्यात आली. तुषारच्या अटकेनंतर धक्कादायक प्रकार समोर आला. तुषार हा मसाज पार्लरमध्ये काम करणाऱ्या महिलेचा पती आहे. त्यांच्यात वाद सुरु आहे. ते दोघं वेगळे राहतात. फक्त पत्नीसोबत शंकरची यां मैत्री आहे, याचा फायदा घेत त्याने ब्लॅकमेल केले. तुषार अखेर पोलिसांच्या जाळ्यात सापडाला. तुषारच्या पत्नीचा या गुन्ह्यात कितपत सहभाग आहे, याचा पोलिस तपास करत आहेत.

## करोना रुग्णांना मदत करणारी संस्था 'किरण मेडिकल जिवनदान ट्रस्ट'

**वसई/प्रतिनिधी**



मुंबईसह राज्यात करोना रुग्णांची संख्या वाढत आहे. अश्याच एका संस्थेने रात्र दिवस रुग्णाची सेवा करून अनेकांना जीवदान दिले आहे. किरण मेडिकल जिवनदान ट्रस्ट संस्थापक किरण सुरेश मोरे विरार येथील रहिवासी आहेत. गरीबाची रणरागिणी यांनी असा निश्चय केला की गरीब लोकांची सेवा करणार आसे तिने तिच्या मातोश्री पुष्पा सुरेश मोरे व दोन भाऊ अजय सुरेश मोरे, प्रेम सुरेश मोरे यांच्या समोर भावना व्यक्त केल्या. त्या दिवसांपासून त्यानी गरीब लोकांसाठी दान करण्यास सुरुवात केली. आजच्या करोना काळात त्यांनी सुरुवात केलेली संस्था किरण मेडिकल जिवनदान ट्रस्ट लोकांचं जिव वाचवण्यासाठी प्रयत्न करत आहे. किरण मेडिकल जिवनदान ट्रस्ट संस्थापक किरण सुरेश मोरे यांच्या संस्थेचला असंख्य लोकांचे मदतीसाठी फोन येत असतात. रात्री अपरात्री त्यांच्या संस्थेचे लोक घरदार सोडून जिवाची पर्वा न करता मदत करायला जातात. मग ती मदत त्यांच्या कार्यकक्षेच्या बाहेर असली तरी ते मागे हटत नाही. सध्याच्या करोना काळात कोणाला व्हेंटिलेटर तर कोणाला ऑक्सिजन बेड तर कोणाला प्लाझ्मा पाहिजे असतो, तर अनेकजण हॉस्पिटलचे बिल कमी करण्यासाठी त्यांच्या संस्थेकडे फोन करीत असतात. अश्या वेळी कोणतीही वेळ न पाहता किरण सुरेश मोरे आपली टीम घेऊन निघतात. मुंबई मीरा रोड ते वसई, विरार परिसरात ते रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मदत करीत असतात. कितेक गरीब लोकांचे रुग्णाचे बिल कमी करून दिले, तर अनेकांना ऑक्सिजन, व्हेंटिलेटर बेड मिळवून दिला. असे अनेक उदाहरणे देता येतील. त्यांच्याकडे सर्व रुग्णालयांची यादी, फोन नंबर तसेच कोविड नियंत्रण कक्षाशी संपर्क असल्याने कोणत्या परिसरात, कोणत्या रुग्णालयात किती बेड खाली आहेत, याची सविस्तर माहिती त्यांच्या संस्थेकडे असते. किरण मेडिकल जिवनदान ट्रस्ट म्हणजे वसई, नालासोपारा, विरार, पालघर, मुंबई महाराष्ट्र भागातील एक चालते फिरते मदत केंद्र झाले असून करोना काळात त्यांची ही मदत मोठा हातभार लावत आहे.

## मुस्लिम बांधवांनी घरीच साजरी केली 'ईद'

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी तालुक्यातील गावागावात तमाम मुस्लिम समाज बांधवांनी शुक्रवार दि.१४ मे रोजी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या निर्देशानुसार आपापल्या घरीच ईदची नमाज अदा करीत एकमेकांना मोबाईल वरून शुभेच्छा देत रमजान ईद साजरी केली. इस्लाम धर्मातील सर्वात मोठा व पवित्र असे असलेले रमजान ईद निमित्त ईद-उल-फित्र ची नमाज देवणी शहरातील जामा मस्जिद, मोमीन मज्जिद, बिलाल मज्जिद व ईक्रराम मज्जिद मध्ये शुक्रवारी सकाळी शासकीय निर्देशानुसार फक्त इमाम व मोजन यांनी मोजक्या लोकांच्या उपस्थितीत ईद-ऊल- फित्र ची नमाज अदा केली. तसेच तालुक्यातील वलांडी, बोरोळ, जवळगा, कवठाळ, गुरुनाळ, आंबेनगरसह मुस्लिम बहुल गावात शासनाच्या निर्देशानुसार मुस्लिम समाज बांधवांनी ईद ची नमाज घरीच राहून अदा केली. मानव जातीच्या सुख शांती व कल्याणासाठी व तसेच या महामारीतून लवकर सुटका व्हावी यासाठी अल्लाहकडे दुआॅ मागितली व नमाजनंतर फोनवरून एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

## राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात बसवेश्वर जयंती साजरी




**लातूर/प्रतिनिधी**

येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात विश्वगुरु, समतानायक महात्मा बसवेश्वर यांची जयंती प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करीत साजरी करण्यात आली. यावेळी बोलताना प्राचार्य केंद्रे म्हणाले की, बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी केलेले कार्य जगासाठी मार्गदर्शक आहे. समता, मानवता, कायक आणि दासोहावर आधारित त्यांचे तत्त्वज्ञान आजही आपणास खूप उपयोगी पडते. बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी निर्माण केलेले अनुभव मंटप आज जगातील पहिली संसद म्हणून समोर आली आहे, ही गोष्ट तमाम भारतीयांच्या दृष्टीने गौरवाची बाब आहे. आज महात्मा बसवेश्वरांच्या स्मृतीला उजाळा देण्याचा दिवस असून त्यांच्या पावलावर चालण्याची प्रतिज्ञा घेण्याचा हा दिवस असल्याचे शेवटी प्राचार्य केंद्रे यांनी नमूद केले. या प्रसंगी मुख्याध्यापक आर.पी. मुंढे, एस. एन. वाडीकर, पी.एम. गित्ते, एस. व्ही.चिकले आदी उपस्थित होते.